## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| 'तेभागा' चळवळीतील स्त्रियांचा सहभाग | ३ |
| ~~"तेव्हा मी काय केले"~~ | ७ |
| दहा गुंठे जमीन (कथा) | ९ |
| फॅशन्स–काही प्रतिक्रिया | ११ |
| पाणवठा | १५ |
| शेतमजूर परिषद | १७ |
| आंदळीच्या माळणी | २० |
| झुंज (कादंबरी) | २३ |
| आंबेवाडी झोपडपट्टी महिला आघाडी | २७ |
| एकदा एका गावी (नाटिका) | २९ |
| कामगार संघटनेतील स्त्रियांचा सहभाग | ३२ |
| वाचकांचे मनोगत | ३४ |


---

**वाचकांस नम्र विनंती :**

१९७९ ची वर्गणी त्वरीत पाठवावी.
**वार्षिक वर्गणी : सात रुपये**
(टपालखर्च–एक रुपयासह).

---

★ अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

---


| संपादक | साहाय्यक |
|---|---|
| सौदामिनी राव | **लीला भोसले**, लता भिसे |

पत्रव्यवहाराचा पत्ता :
सौदामिनी राव, ९७ प्रभात रस्ता, पुणे ४.


---

# संपादकीय

## स्त्री-मुक्ती आंदोलन : चर्चा सत्र

१९७५ साल आंतरराष्ट्रीय स्त्री-वर्ष म्हणून गाजले. भारतातही निरनिराळ्या थरातील स्त्रियांनी, संघटनांनी परिषदा, परिसंवाद, सत्कार, वगैरे कार्यक्रम घेऊन 'स्त्री मुक्तीचा' विचार पुढे आणला. एका तीव्रतेने या प्रश्नावर निरनिराळ्या माध्यमातून चर्चा सुरू झाल्या. पुणे येथे झालेल्या 'स्त्री मुक्ती संघर्ष परिषदेने" स्त्री मुक्तीचा अर्थ कामगार, कर्मचारी, शेतमजूर, दलित, आदिवासी स्त्रियांपर्यंत पोचविण्याचा छोटासा प्रयत्न एकजुटीने केला. या परिषदेला जवळ जवळ ७५ टक्के स्त्री प्रतिनिधी या थरातील होत्या. परंतु नंतरच्या काळामध्ये या सर्व प्रयत्नात सातत्य राहिले नाही. परिणामी भरीव अशी चळवळ उभी राहू शकली नाही.

पुन्हा एकदा एका चर्चासत्राच्या साहाय्याने सर्व थरातील स्त्रियांमध्ये हा विचार नेण्यासाठी, स्त्री म्हणून त्यांची होणारी सर्व क्षेत्रातील परवड चव्हाटचावर आणून त्यांना झगडयासाठी, अन्यायाच्या प्रतिकाराला सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरविले जात आहे. ठिकठिकाणी सर्व थरातील स्त्रियांकडून एकेकटे व सामुदायिक रित्या जे प्रयत्न चालू आहेत त्यांच्या साहाय्याने एकजूटीची एक व्यापक स्त्री-मुक्ती चळवळ उभी राहावी असे वाटणाऱ्या काही कार्यकर्त्या एकत्र आल्या. विचारसरणी, पक्ष व इतर काही जे अडथळे असतील ते आड येऊ न देता त्या एकत्र आल्या. दि. १० नोव्हेंबर रोजी पुण्यामध्ये एक सभा होऊन त्यात ८ मार्च दिनाचे निमित्ताने एक चर्चासत्र पुण्यात घेण्याचे ठरले. चळवळीला पोषक वातावरण निर्माण कसे करता येईल यावर निरनिराळ्या क्षेत्रात, व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रियांमध्ये चर्चा घडवून आणण्याचा उद्देश आहे.

## ८ मार्च – आंतरराष्ट्रीय महिला-दिन

गेल्या वर्षी अनेक ठिकाणी एकजुटीने हा दिन पाळण्यात आला. स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय सर्वच पातळीवरचे प्रश्न तीव्र झाले आहेत. काहीतरी संघटित आवाज उठवला पाहिजे या जाणीवेचेच हे द्योतक आहे. एका बेकारीच्या प्रश्नाने स्त्रीची सर्वच बाजूने ससेहोलपट होते आहे. कुठेही ग्रामीण, शहरी कष्टकरी स्त्रियांच्यात जो पहिला प्रश्न त्या पोटतिडकीने मांडतील तो कामधंद्यांचा. मग ती बाई कामगार असो, शेतमजूर असो, दलित असो, गरीब असो किंवा मध्यम वर्गातील असो. शिवाय स्त्री म्हणून कामावर, कुटुंबात, समाजात हेळसांड चालूच आहे. अत्याचार, दारुमुळे होणारी मारहाण, परित्यक्ता, विधवा, देवदासी जीवनातील परवड यातही वाढच झाली आहे. म्हणून ठिकठिकाणी असंतोष खदखदतो आहे. अवती भोवती समाजातील निरनिराळ्या घटकांचे सद्यपरिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्याचे चाललेले प्रयत्न त्या पहाताहेत. आपापल्या परीने भागीदारी करताहेत. आपल्याही प्रयत्नांना स्थायी स्वरुप द्यावे, प्रसंगाप्रसंगाने स्फोट होऊन काही उपयोग नाही; म्हणून निरनिराळ्या व्यवसायातील कामगार, शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, दलित, प्राध्यापक विद्यार्थीनी, डॉक्टर, गृहिणी, लेखिका, रेडिओ, टी. व्ही वरील स्त्री कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन ठिकठिकाणी आपआपल्या कुवतीनुसार कसे काम करता येईल, स्त्री मुक्ती चळवळीचे वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि चळवळीला संघटित रूप देण्याच्या दृष्टीने प्रयत्न कसे करता येतील यावर चर्चा करण्यासाठी दि. १०, ११ फेब्रुवारी रोजी पुणे येथे चर्चासत्र घेण्याचे ठरले आहे. १९७९ चा ८ मार्च एकजुटीने सर्वत्र पाळला जात असताना, या दिवशी ज्या मागण्या ठरतील, जे निर्णय घेतले जातील त्यांवर लक्ष केंद्रित व्हावे अशा रीतीने प्रयत्न करावे असेही ठरले.

आपणास वरील कार्यक्रमाबद्दल अधिक माहिती हवी असेल तर कृपया खालील पत्त्यावर त्यासंबंधी विचारणा करावी.

## अग्रक्रमाच्या स्त्री-समस्या

स्त्रियांच्या संदर्भातील आपणास जाणवत असलेल्या, दोन-तीन महत्त्वाच्या समस्या कोणत्या आणि त्याबाबत आपल्या दृष्टीने उपाय योजना कोणती करावी याविषयी थोडक्यात टिपण (३०० ते ४०० शब्द) तयार करून १ जानेवारी १९७९ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावे ही विनंती. उदाहरणादाखल काही समस्या पुढे दिल्या आहेत.

१) काम मिळण्यातील अडचणी व अनिश्चितता, कामावरील वागणूक, असुरक्षितता, वेतनाचा दर २) कौटुंबिक, उदा० लग्नविषयक, घरातील जाच, दारूचे परिणाम, घरकामाचा बोजा, लहान मुले सांभाळण्यातील अडचणी इत्यादी. ३) वस्ती–गाव पातळीवरील उदा० पाणी, संडास याची उणीव, असुरक्षिततता, वैद्यकीय सोयीचा अभाव, शैक्षणिक अडचणी, बाजारवहातूक गैरसोयी.

शेकडोंनी पत्रे पाठवून बायजाचे वाचक आपले टिपण चर्चेसाठी पाठवतील असा आम्हास विश्वास वाटतो.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

सौदामिनी राव
१७, प्रभात रस्ता, पुणे ४.

* * *

१९७८ मधील हा शेवटचा अंक आपल्या हाती देताना आम्हाला असा जरूर विश्वास वाटतो की आपण नवीन वर्षाकरता 'बायजा' चे वर्गणीदार लगोलग होऊन नव्या वर्षी अधिक भरीवपणे 'बायजा'चा उपक्रम चालू ठेवण्यात आम्हाला प्रोत्साहन द्याल. **बायजाची** १९७९ ची वार्षिक वर्गणी : सात रुपये. (टपालखर्च– एक रुपयासह)

आपणास वेगळे स्मरणपत्र पाठविण्याची आवश्यकता वाटणार नाही व आपण त्वरीत आपली १९७९ ची वर्गणी पाठवून आपला सक्रीय पाठिंबा कायम ठेवाल अशी उमेद वाटते.

— संपादक